॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

जीवन म्हणजे एक प्रवास आहे,
नेहमी शिकत राहा.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट

'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर

आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.

आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप

आता बातमीबरोबरच बरेच काही

मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २९ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ४५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

## SPOT NEWS

### सीमावर्ती भागांत आज मॉक ड्रिल

**● नवी दिल्ली** – पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ६-७ मे च्या मध्यरात्री ऑपरेशन सिंदूर सुरू केले. सुमारे २५ मिनिटे चाललेल्या या ऑपरेशनमध्ये भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. या कारवाईत सुमारे १०० दहशतवादी ठार झाले. त्या ऑपरेशनदरम्यान देशभरात मॉक ड्रिल राबविण्यात आले होते.आता पुन्हा एकदा गुरुवारी संध्याकाळी पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या राज्यांमध्ये मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले आहे. हे मॉक ड्रिल गुजरात, पंजाब, राजस्थान आणि जम्मू-काश्मीरमध्ये आयोजित केले आहे. या काळात नागरिकांना सतर्क राहण्याचे निर्देशही दिले जातील. भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानमध्ये प्रचंड घबराटीचे वातावरण आहे.

### नवी मुंबई विमानतळावरून उड्डाण करणारी इंडिगो पहिली विमान कंपनी ठरणार

**● नवी मुंबई** – भारतीय विमान कंपनी इंडिगो अदानी समूहाच्या मालकीच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण सुरू करणारी पहिली विमान कंपनी ठरणार असल्याचे वृत्त आहे. एनएमआयएवरून उड्डाण सुरू करणारी पहिली एअरलाइन भागीदार म्हणून इंडिगोची घोषणा करताना आम्हाला आनंद होत आहे. ही भागीदारी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ट्रान्सफर हब म्हणून एनएमआयएचे स्थान निश्चित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे असे अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल यांनी सांगितले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिल्या दिवसापासून १५ हून अधिक शहरांमध्ये दररोज १८ उड्डाणे करण्याचे इंडिगोचे उद्दिष्ट आहे. नोव्हेंबर २०२५ च्या सुरुवातीपर्यंत नवी मुंबई विमानतळावरून दररोज ७९ उड्डाण घेतील आणि यापैकी १४ आंतरराष्ट्रीय असतील, असे आश्वासन इंडिगोने दिले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ३,७०० मीटर लांबीचा धावपट्टी असेल. या विमानतळावरून दरवर्षी सुमारे ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२ टन मालवाहतूक केली जाईल, अशी माहिती इंडिगोच्या एका अधिका-याने दिली. २ हजार ८६६ एकरच्या या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे २०२५ च्या पहिल्या सहामाहीत उड्डाणांसाठी उद्घाटन होण्याची अपेक्षा आहे.

# खरीप पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ

**मोदी सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा । केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती**

**● नवी दिल्ली । वीरभूमी-**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले. या बैठकीत मोदी सरकारने शेतक-यांनाही मोठे गिफ्ट दिले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठी तांदळाच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) ६९ रुपयांची वाढ करून, ती २,३६९ रुपये प्रति क्विंटल करण्यास मान्यता दिली आहे. यासाठी २ लाख ७ हजार कोटी रुपये एवढा खर्च येणार आहे.

यासंदर्भात माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, शेतकऱ्यांसाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या १०-११ वर्षांत खरीप पिकांसाठीच्या एमएसपीमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणून २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठीही किमान आधारभूत किमतीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. एकूण रक्कम सुमारे २,०७,००० कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे. प्रत्येक पिकासाठी खर्चासह ५० टक्के रक्कम विचारात घेण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, शेतकऱ्यांसाठी व्याज सवलत कायम



ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, ज्यासाठी १५,६४२ कोटी रुपये खर्च येईल. किसान क्रेडिट कार्डवर २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज ४ टक्के व्याजदराने देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. देशात ७.७५ कोटींहून अधिक किसान क्रेडिट कार्ड खाती आहेत. याचा आता लहान आणि सीमांत शेतक-यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होईल.

याशिवाय, मध्य प्रदेशातील रतलाम ते नागदा दरम्यानचा रेल्वे मार्ग ४ लेन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. याची लांबी ४१ किलोमीटर असेल. तसेच, महाराष्ट्रातील वर्धा रेल्वे मार्ग आणि तेलंगणामधील बल्लारशाह रेल्वे मार्ग ४ लेन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने बडवेल-गोपावरम गाव (एनएच-६७) ते आंध्र प्रदेशातील गुरुविंदपुडी (एनएच-१६) पर्यंतचा ४-लेन बडवेल-नेल्लोर महामार्ग बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे. या महामार्गाची लांबी १०८.१३४ किलोमीटर एवढी आहे, त्यासाठी ३६५३.१० कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे.

## अंगणवाडी केंद्रांना प्रोत्साहन भत्ता देणार : आदिती तटकरे

**● मुंबई । वीरभूमी-**

एकात्मिक बालविकास सेवा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, पूर्व शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारणे यासाठी विविध निकषांवर अंगणवाडीचे गुणात्मक मूल्यमापन करण्यात येणार आहे. याचबरोबर गुणांकनानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

मंत्रालयात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या प्रोत्साहन भत्ताच्या निकषांमध्ये सुधारणा करणेबाबत तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार वितरणाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सचिव डॉ. अनुपकुमार यादव, सह सचिव वी. रा. ठाकूर, एकात्मिक बाल विकास विभागाच्या उपायुक्त श्रीमती संगीता लोंढे, विभागाचे उपायुक्त राहुल मोरे, उपसचिव प्रसाद कुलकर्णी आदींसह अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी एकत्रित केलेल्या कामाच्या निकषानुसार प्रोत्साहन भत्ता दिला देण्याकरिता अंगणवाडी केंद्राकरिता निकष ठरविण्यात येणार आहेत. अंगणवाडी केंद्राने १० पैकी ७ निकष पूर्ण केल्यास १४०० रुपये, ६ निकष पूर्ण केल्यास १६०० रुपये, ९ निकष पूर्ण केल्यास १८०० रुपये व १० निकष पूर्ण केल्यास २००० याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवा निवृत्ती नंतर किंवा मृत्यू झाल्यास कुटुंबियांना ग्रॅच्युइटी (एकरकमी आर्थिक सहाय्य) देण्या संदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी दिले. विविध योजनांचा लाभ सरासरीपेक्षा कमी असणे, खुजी बालके यांचे प्रमाण प्रकल्पाच्या सरासरीपेक्षा कमी असणे असे निकष ठरविण्यात आले आहेत.

## पावसाच्या पाण्याच्या डबक्यात बुडून दोन बालकांचा मृत्यू

**● नगर । वीरभूमी-**

चास (ता. अहिल्यानगर) शिवारात घराजवळ साचलेल्या पावसाच्या पाण्याच्या डबक्यात पडल्याने दोन बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २७ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली.

अमितेश बलराज बिडे (वय १०) व अनिकेत बलराज बिडे (वय ०६, दोघे रा. चास, ता. अहिल्यानगर)) असे मयत बालकांची नावे आहेत. ते दोघे सख्खे भाऊ आहेत.

याप्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या अमितेश व अनिकेत हे दोघे सख्खे भाऊ त्यांच्या घराजवळ पावसाच्या पाण्यामुळे साचलेल्या डबक्यात पडले. त्याच्या नातेवाईकांना ही घटना कळताच त्यांनी त्या दोघांना बाहेर काढले.

ते बेशुध्द झाल्याने त्यांचे चुलते जयसिंग बिडे यांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना उपचारापुर्वीच मयत घोषित केले. तशी माहिती जिल्हा रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना दिली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे चास शिवारात शोककळा पसरली.

घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या विकास आराखड्यासाठी ६८१ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता

**● मुंबई । वीरभूमी-**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मगाव असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यातील मौजे चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाचे जतन व संवर्धन विकासासासाठी ६८१ कोटी ३२ लाख रुपयांच्या विकास आराखड्यात प्रशासकीय मान्यता दिली असून त्यासंदर्भातील शासननिर्णय नियोजन विभागाने आज जारी केला आहे. सदर आराखड्याच्या संनियंत्रण आणि अंमलबजावणीची जबाबदारी अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात सातत्याने संबंधीतांच्या बैठका घेऊन पाठपुरावा केल्यामुळे सदर शासन निर्णय निश्चित वेळेत जारी होऊ शकला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

जगातील सर्वकालिन सर्वश्रेष्ठ स्त्री राज्यकर्त्या असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जन्मगावी चौंडी येथील त्यांच्या स्मृतीस्थळाचा विकास व्हावा यासाठी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार प्रयत्नशील होते. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केलेली आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय दर्जाची महत्वाची स्थळे, तीर्थक्षेत्रे परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती आणि स्वरुप लक्षात घेऊन संबंधीत आराखडे नियोजन विभागामार्फत राबविण्यात येतात. स्थानिक पातळीवरील संबंधित आणि तज्ज्ञांशी चर्चा करुन चौंडी स्मृतीस्थळ जतन व विकास व त्यास लागणाऱ्या निधीचा आराखडा अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केला. त्यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या माध्यमातून ६ मे २०२५ रोजी चौंडी येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानंतर दोन आठवड्यातंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागाने ६८१ कोटी ३२ लाख रुपये खर्चाच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मंजूरीचा शासननिर्णय आज जारी केला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे यंदा त्रिशताब्दी जन्मवर्ष असून त्यानिमित्ताने त्यांच्या चौंडी जन्मगावी ६ मे २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत घेतलेल्या घेतलेल्या निर्णयानुसार नियोजन विभागाने निश्चित वेळेत आज शासननिर्णय जारी केला. या शासननिर्णयानुसार विकास आराखड्यातील कामे करताना त्यांचे ऐतिहासिक महत्व, वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या व्यक्ती, संस्थांकडूनंच ही कामे करु घ्यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. जी कामे केंद्र शासनाच्या योजना, स्वदेश दर्शन योजना किंवा अन्य योजनांमधून शक्य आहेत. ती त्या माध्यमातून पूर्ण करण्यात येणार आहेत. विकास आराखड्यातील सर्व कामे पुढील तीन वर्षात ३१ मे २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देशही शासन निर्णयात दिले आहेत.

# पावसामुळे भाजीपाला भिजला; ग्राहकांना महागाईचा फटका

**● मुंबई । वीरभूमी-**

नवी मुंबईतील बाजार समितीत एपीएमसीमध्ये गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोरदार बॅटिंग केली. जोरदार पावसामुळे भाज्या आणि फळांची आवक घटली. तर अनेकांचा माल पाण्यात बुडाला. पाण्याने भाजीपाला लवकर खराब होण्याची भीती व्यापा-यांना सतावत आहे.

दरम्यान, नवी मुंबईत गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोरदार बॅटिंग केली. पावसाचे पाणी शिरल्याने येथे भाजीपाला आणि फळांची आवक घटली आहे. तर आहे तो भाजीपाला आणि फळे भिजल्याने लवकर खराब होण्याची भीती व्यापा-यांमध्ये आहे. आता भाज्यांची आवक घटल्याने आणि नाशवंत माल असल्याने भाजीपाल्याचे दर कडाडण्याची भीती आहे. सध्या भाजीपाल्याच्या दरात सरासरी ३० ते ३५ टक्क्यांची वाढ झाली आहे. दरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याने येत्या काही दिवसांत भाजीपाला महागण्याची शक्यता आहे.

सोमवारी आणि मंगळवारी पहाटे भाज्या आणि फळे एपीएमसीमध्ये पोहोचली. नेहमीपेक्षा आवक घटली. जो माल आला तोही पावसात भिजल्याने भाज्यांसह फुटलेली फळे फेकून देण्याची वेळ आली. दुसरीकडे राज्यातील अनेक भागांना पावसाने झोडपले. नदी-नाले खवळले. रस्ते जलमय झाले. त्यामुळे मुंबईला भाज्या आणि फळांच्या पुरवठ्याला फटका बसला. भाजी एकतर कमी प्रमाणात आली. त्यातही खराब माल निघाल्याने व्यापारी चिंतेत सापडला. आता ग्राहकांच्या खिशावर या सर्व घडामोडींचा ताण येणार आहे.

रविवारी बाजाराला सुटी असते. तर सोमवारी पावसामुळे अनेक जण बाजाराकडे फिरकले नाहीत. मंगळवारी ग्राहक बाजारात आले. तेव्हा चांगला माल नसल्याने अनेकांची निराशा झाली. त्यातच जो माल आहे, त्याची पण किंमत अधिक असल्याने ग्राहकांना जादा दाम मोजावे लागले. ताज्या दरानुसार, टोमॅटो आता २० रुपयांवरून किलोमागे ४० रुपयांच्या घरात तर कोबीचा भाव ३० ते ४० रुपयांच्या घरात पोहोचल्याचे समोर आले.



मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच सततच्या पावसामुळे कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. काढून ठेवलेला शेतातील अनेक शेतक-यांचा कांदा भिजल्यामुळे या कांद्याला व्यापारी खरेदी करत नसल्याने संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्याने नाशिकच्या निफाड तालुक्यात चारा-पाण्याच्या शोधात असलेल्या मेंढ्यांपुढे कांदा ओतून देत आपला संताप व्यक्त केला. या कांद्यावर मेंढ्यांनी ताव मारला.

# पिकांचे व नुकसानग्रस्त घरांचे तात्काळ पंचनामे करा

## आमदार काशिनाथ दाते यांचे प्रशासनाला आदेश । नुकसानग्रस्त भागाची केली पहाणी

● **पारनेर । वीरभूमी –**

पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघातील खडकी, अकोळनेर, सारोळा कासार येथे मंगळवारी दुपारी २ च्या सुमारास अतिवृष्टी झाल्यामुळे या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मंगळवारी दुपारी झालेल्या अतिवृष्टीमुळे या गावांमध्ये पुर परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतात वत् घरामध्ये पाणी गेले आहे. शेत जमीन व शेती पिके वाहून गेल्यांने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून घरांचे लहान मोठ्या स्वरूपात नुकसान झाले आहे .

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी आमदार काशिनाथ दाते यांनी संवाद साधत व्यथा जाणून घेऊन आम्ही सर्व तुमच्या सोबत आहे असा धीर शेतकऱ्यांना देत नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत असे आदेश आमदार कशिनाथ दाते सर यांनी नगर तालुका तहसीलदार संजय शिंदे यांना दिले आहेत.



> खडकी, अकोळनेर, सारोळा कासार या गावांमध्ये अतिवृष्टीमुळे ओढ्या नाल्यांचे पाणी घुसून अथवा पाणी साठून ज्या पिकांचे अथवा शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तेथे तहसीलदारांनी खात्री करून पंचनामे करावेत अशा सूचना केलेल्या आहेत. आहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवी यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार आहे.
>
> **– आ. कशिनाथ दाते,** पारनेर विधानसभा

अतिवृष्टीमुळे खडकी, अकोळनेर, सारोळा कासार परिसरात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात कांदे पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली जनावरे, शेळया, मेंढ्या, गोठा, पत्रे पुराच्या पाण्यामध्ये वाहून गेले आहे. गावातील रस्ते, पुल, बंधारे वाहून गेले आहेत तर वीज वितरण व्यवस्थेचे देखील मोठे नुकसान झाले. आजअनेकांच्या घराचे पत्रे उडून संसार उघड्यावर आले आहेत. खडकी परिसरात झाडे उन्मळून पडली कांदा, टॉमॅटो, बिजली, झेंडू यासह इतर पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे विजेचे पोल पडून वीजपुरवठा खंडित झाला असून खडकी परिसरात १५ हुन अधिक विजेचे पोल पडले आहेत.

# SPOT NEWS

## श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला ४ कोटी १५ लाखाचा विक्रमी निव्वळ नफा

● **नगर । वीरभूमी –**

श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला सर्व प्रकारच्या तरतूदी वजा जाता ३१ मार्च २०२५ अखेर रु.४.१५ कोटी रुपयांचा विक्रमी निव्वळ नफा झाला आहे. तसेच संस्थेकडे वर्ष अखेर रु.८३.६२ कोटी रुपयांच्या ठेवी असून कर्ज वितरण रु.५७.६० कोटी रुपयांचे झाले आहे. अशी माहिती संस्थेचे चेअरमन किसनलाल बंग यांनी दिली. संस्थेच्या संचालक मंडळाची सभा नुकतीच चेअरमन किसनलाल बंग यांचे अध्यक्षतेखाली पार पडली संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक सी.ए. एन.जे.लोहे अँड कंपनी चे सी.ए. पुनीत व्होरा यांनी सन २०२४–२०२५ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद सादर केला. सभेला सर्वश्री श्रीगोपाल धूत, व्हा.चेअरमन राजेंद्र मालू, राजेंद्र गुजराथी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, प्रकाश गांधी, विश्वनाथ कासट, गोपाल मणियार, मधुसूदन सारडा, राजेंद्रकुमार कंत्रोड, ॲड. अशोक बंग, अनुराग धूत, राजकमल मिनियार, शोभा राठी, अनुरिता झगडे, देवराव साठे, साईनाथ कावट, हे उपस्थित होते तसेच व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक व ओ.एस.डी कुमार आपटे हे देखील उपस्थित होते. सर्वानी नूतन चेअरमन किसनलाल बंग व व्हा.चेअरमन राजेंद्र मालू तसेच आर्थिक वर्ष २०२४–२५ या वर्षात कार्यरत असेलेले चेअरमन श्रीगोपाल धूत, गोपाल मणियार आणि व्हा. चेअरमन ओमप्रकाश चांडक व मधुसूदन सारडा यांचे उपस्थित संचालकांनी अभिनंदन केले. चेअरमन श्री.किसनलाल बंग म्हणाले की, संस्थेने इतर बँकेत ८१.०२ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केली आहे. रिझर्व्ह फंड व इतर निधी ३४.८० कोटी रुपये उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या नेट एन.पी.ए. नेहमी प्रमाणे शून्य आहे. संस्थेचे संस्थापक संचालक श्रीगोपाल धूत यांचे बहुमोल मार्गदर्शन, शिस्तबध्द व उत्कृष्ट कार्यपद्धती व्हा.चेअरमन राजेंद्र मालू व सर्व संचालकांचे योगदान यामुळेच संस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या सहकार्यामुळेच भरीव कार्य करता आले असेही त्यांनी संगितले.

## भिस्तबाग चौक परिसरातून ७० हजार रुपयांची केबल चोरीला

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड येथे बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या साईटवरून ७० हजार रुपये किमतीचे इलेक्ट्रीक फिटींगचे वायर चोरीला गेले. या प्रकरणी कंपनीचे इंजिनिअर अरबाज गफ्फार सय्यद यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावीर कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत भिस्तबाग चौकात क्राऊन प्लाझा या इमारतीचे बांधकाम करण्यात येत असून, लाईट फिटींगचे काम सध्या सुरू आहे. लाईट फिटींगचे काम करणारे कामगार दि. २५ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास काम संपवून गेले. दुसऱ्या दिवशी दि. २६ रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास पुन्हा कामगार आले असता अप्पर बेसमेंटमधील काम केलेल्या वायरमधील काही वायर तोडून नेल्याचे लक्षात आले. या दिवशी चोरट्याचा शोध घेतला. परंतु कोणी मिळून आले नाही. त्यानंतर दुस–या दिवशी दि. २७ रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास पुन्हा साईटवर गेल्यावर अप्पर बेसमेंट, पहिला, दुसरा व तिसरा मजल्यावरील काम केलेल्या वायर चोरी झाल्याचे दिसून आले. या दोन दिवसांत सुमारे दोन हजार मीटर लांबीच्या व अंदाजे ७० हजार रुपये किमतीच्या वायरची चोरी झाली.

## मालमत्ता कर व पाणीपट्टी भरण्यास नागरिकांचा मोठा प्रतिसाद

● **नगर । वीरभूमी –**

नवीन आर्थिक वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरासह बिले वाटप करण्यात आले आहे. महानगरपालिका अधिनियमानुसार एप्रिल महिन्यात सर्वसाधारण करावर १० टक्के सवलत दिली जाते. मात्र, यंदा ३१ मेपर्यंत सर्वसाधारण करावरील १० टक्के सवलत कायम ठेवण्यात आली आहे. शहरातील ३१७२७ मालमत्ताधारकांनी याचा लाभ घेऊन कर भरला आहे. सवलतीसाठी अखेरचे तीन दिवस शिल्लक राहिले असून, नागरिकांनी याचा लाभ घेऊन वेळेत कराचा भरणा करावा व दंड टाळावा, असे आवाहन महानगरपालिकेने केले आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीला मागील आर्थिक वर्षात नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे विक्रमी वसुली झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० अ नुसार करात एप्रिलमध्ये १०%, मे व जूनमध्ये ८% अशी सर्वसाधारण करात सूट दिली जाते. या वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरानुसार बिले वाटप करण्यासाठी काही प्रमाणात विलंब झाला आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात दिली जाणारी १०% सवलत अनेकांना मिळू शकली नाही. नवीन दरानुसार बिलांचे वाटप केल्याने काहींना उशिरा बिले मिळाली. त्यामुळे नागरिकांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी मे महिन्यातही १० टक्के सवलत सर्वसाधारण करावर देण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात २७ मे पर्यंत ३१७२७ मालमत्ताधारकांनी सवलतीचा लाभ घेतला. त्यांना आत्तापर्यंत सुमारे ७० लाख रुपयांची सवलत देण्यात आली आहे. सवलतीसाठी आता तीन दिवस शिल्लक राहिले असून, नागरिकांनी याचा लाभ घ्यावा व ३१ मे अखेरपर्यंत मालमत्ता कर व पाणीपट्टी भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे. दरम्यान, ज्यांना बिले मिळाली नसतील अशा नागरिकांनी त्यांच्या प्रभाग समिती कार्यालयात जाऊन बिल काढून घ्यावे व सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## बाबुजी आव्हाड महाविद्यालय आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्यात सामंजस्य करार

● **पाथर्डी । वीरभूमी–**

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी करारावर स्वाक्षरी केली. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करियर कट्टा उपक्रमार्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर विविध कार्यक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षाबाबत सखोल मार्गदर्शन केले जाते.



या उपक्रमाचा विस्तार आणि अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याचा उद्देशाने पुणे विभागातील करियर कट्टा संलग्न महाविद्यालयाची सहविचार सभा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, पुणे येथे नुकतीच पार पडली. या सभेचे उद्घाटन युजीसी–एमएमटीटीसीचे संचालक डॉ. संतोष केंद्रे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ. नितीन घोरपडे व अहिल्यानगरचे प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतिषचंद्र सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. राजधर टेमकर, प्राचार्य भाऊसाहेब देशमुख, विभागीय समन्वयक डॉ. संजय खिलारे, जिल्हा समन्वयक डॉ. नवनाथ नांगरे व डॉ. भागवत परकळ महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक डॉ. किरण गुलदगड, डॉ. अभिमन्यू ढोरमारे व इतर मान्यवर उपस्थित होते. या विशेष प्रयत्नांबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव आव्हाड व सर्व कार्यकारणी सदस्य यांनी प्राचार्य डॉ. बबन चौरे, करियर कट्टा समन्वयक डॉ. किरण गुलदगड व डॉ. अभिमन्यू ढोरमारे यांचे अभिनंदन केले आहे

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्या

## कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने शेवगाव तहसीलदारांना निवेदन

● **शेवगाव । प्रतिनिधी–**

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, या मागणीचे निवेदन भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांच्या उपस्थितीत नायब तहसीलदार दीपक कारखिले यांना आज देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यात गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. मे महिन्यात शेतकऱ्यांचा कांदा, भुईमूग, उन्हाळी बाजरी या पिकांसह आंबा या फळांचा सिझन असतो. कांदा व बाजरी काढणी सुरू असतानाच पाऊस सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच कपाशी, सोयाबीन व तुरीला योग्य भाव मिळाला नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. अशात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने सर्व परिस्थिती पाहून शेतकऱ्यांना त्वरीत शासकीय मदत द्यावी.

यावेळी लांडे यांनी अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून त्वरीत नुकसान भरपाई द्यावी, खरीप हंगामातील पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे, खते, बियाणे सावलीतीच्या दरात मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यात यावेत, निवडणूक काळात घोषणा केल्या प्रमाणे शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यात यावी, आदी मागण्या केल्या.

यावेळी ॲड. सुभाष लांडे, भगवान गायकवाड, संदीप इथापे, बबनराव पवार, बबनराव लबडे, दत्ता आरे, अशोक नजन आदी उपस्थित होते.

## अहिल्यानगर पोलीस दलातील ४०० पेक्षा अधिक अंमलदारांच्या बदल्या

● **नगर । वीरभूमी –**

जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदारांच्या प्रशासकीय बदल्यांसाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या नेतृत्वाखाली काल, बुधवारी पोलीस मुख्यालयात भव्य बदली दरबार आयोजित करण्यात आला. सुमारे ४०० पेक्षा अधिक अंमलदारांच्या बदल्यांची ही प्रक्रिया दुपारनंतर सुरू झाली आणि रात्री उशिरापर्यंत चालू होती.

श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई व चालकांपर्यंतच्या विविध पदांवरील अंमलदारांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यामध्ये श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ११, सहायक फौजदार ४३, पोलीस हवालदार ९८, पोलीस नाईक २५, पोलीस शिपाई १९४ आणि पोलीस चालक ३७ अशा विविध पदांवरील अंमलदारांचा समावेश होता. बदलीसाठी पात्र अंमलदारांकडून पूर्वीच अर्ज मागवण्यात आले होते. त्यामध्ये प्रत्येक अंमलदाराला बदलीसाठी तीन पसंती ठिकाणे नमूद करण्याची संधी देण्यात आली होती. बुधवारी दरबारात या पसंतीचा विचार करून अनेक अंमलदारांना समाधानकारक बदली देण्यात आली.

काही अंमलदारांनी आपल्या पसंतीनुसार ठिकाण मिळाल्याने समाधान व्यक्त केले, तर काहींनी पसंतीचा विचार न झाल्याने नाराजी व्यक्त केली. पोलीस अधीक्षक घार्गे यांनी पदभार स्वीकारताच संपूर्ण बदल्यांची प्रक्रिया राबवली असून ती पारदर्शक आणि व्यवस्थित पार पडली.

बदल्यांमुळे अनेक अंमलदारांना त्यांच्या पसंतीची ठिकाणे मिळाली असली तरी काहींचा हिरमोडही झाला. विशेषतः एलसीबीच्या इच्छुकांसाठी हे यंदाचे वर्षसुध्दा अपेक्षाभंगाचे ठरले आहे. बदली दरबारात पोलीस अधीक्षक घार्गे यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, अप्पर पोलीस अधीक्षक (श्रीरामपूर) वैभव कुलबर्मे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस उपअधीक्षक (गृह) गणेश उगले आदी अधिकारी उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## पाथर्डी ते करंजी दरम्यान एसटी बसमध्ये १२ तोळे सोन्याची दागिण्याची चोरी

**पाथर्डी । प्रतिनिधी-**

बहीनीच्या मुलाच्या विवाहासाठी आलेल्या महीलेच्या बॅंगेतील बारा तोळे वजनाचे सोन्याचे दागीने अज्ञात व्यक्तीने पाथर्डी ते करंजी प्रवासात एसटी बस मधुन चोरुन नेले आहेत. पंचफुला मोहन जाधव या महीलेने दागीने चोरल्याची फिर्याद पोलिसात दिली आहे. चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव गुट्टे तपास करीत आहेत. पंचफुला मोहन जाधव (रा. खडकवाडी, पो. निरगुडी, ता. पाटोदा, जि. बीड) या बहीनीच्या मुलाच्या लग्नासाठी मुखेकरवाडी येथे आल्या होत्या. २६ मे २०२५ रोजी जिरेवाडी येथुन भगवानगड -मुंबई या एसटीने त्या प्रवास करीत होत्या. सकाळी दहा वाजता पाथर्डीच्या बसस्थानकावर पाहीले तेव्हा सोन्याचे दागीने पिशवीमधे होते. त्यानंतर बस करंजी येथे गेली असता बॅंगची चैन उघडलेली दिसली तेव्हा दागीने चोरीला गेल्याचे समजले. आरडाओरडा केला तर एसटीत दागीने कोणाकडेही मिळाले नाहीत. जाधव यांनी पोलिसात बारा तोळ्याचे सोन्याचे दागीने चोरीला गेल्याची तक्रार दाखल केली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव गुट्टे तपास करीत आहेत. चोरीच्या एवढ्या घटना घडतात तरीही लोक बारा ते तेरा तोळे सोने घेवुन लग्नाला जातात हे विशेष महत्वाचे आहे. पाथर्डीचे बसस्थानक दागीने व पॉंकीटस चोरणाऱ्यांचे आगर बनले आहे. शेतकऱ्यांच्या पैशाची देखील येथे लुट होते. महीलांचे दागीने व मोबाईल देखील चोरीला जाण्याचे प्रकार रोज घडत आहेत. कोणाचाही व कोणताही धाक चोरट्यांना राहीलेला नाही.

## सरस्वती मंदिर नाईट स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दहावी बोर्डाच्या परीक्षेत यश

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

नगर तालुक्यातील यशवंतनगर येथील उपक्रमशील शिक्षिका संजना चेमटे या कोरोनाकाळापासून वाचन प्रेरणा उपक्रमात निरंतर वाचन उपक्रम यशस्वीपणे राबवित आहेत. या उपक्रमात 'ग्रंथालयाचा ध्यास धरी वाचन संस्कृती विकसित करी' हा नवोपक्रम कायमस्वरूपी राबवितात. या उपक्रमात त्यांनी शाळा चालू असताना शाळेत आठवड्यातून एकदा विविध अवांतर वाचनाच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांनी आनंदाने ही पुस्तके वाचली. त्यानंतर उन्हाळ्यात शाळेला सुट्ट्या लागल्यावर 'ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या दारी' या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या घरी विद्यार्थ्यांचे गट करून 'ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या दारी' हा वाचन प्रेरणा उपक्रम राबविला. या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या घरी विविध अवांतर वाचनाच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवून त्यांना वाचण्यासाठी विविध पुस्तके उपलब्ध करून दिली. तसेच त्यांना घरी वाचण्यासाठी अनेक पुस्तके दिली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आनंदाने विविध पुस्तकांचे वाचन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजली. विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे बहीण, भाऊ, आई, वडील इतर विद्यार्थी यांनाही या वाचन उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. त्यांनीही विविध पुस्तकांचे वाचन केले. त्यामुळे घराघरात वाचन संस्कृती रुजली. वाचनाचे महत्त्व पालकांना, ग्रामस्थांना व इतरांना समजल्यामुळे त्यांनी लोकसहभागातून विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची अनेक पुस्तके दिली.तसेच शिक्षिका संजना चेमटे यांनी आपल्या मुलीच्या विवाहात दहा शाळेच्या ग्रंथालयास विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी एक हजार पुस्तकांचे वाटप केले. त्यामुळे वाचन प्रेरणा उपक्रमाची सामाजिक जनजागृती झाली.

# ज्ञानेश्वर साखर कारखाना मिलरोलरचे पूजन

### कारखान्याचे अध्यक्ष नरेंद्र घुले यांचे हस्ते पुजन । आगामी गाळप हंगामाची पूर्व तयारी सुरु

**नेवासा । वीरभूमी-**

तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे सन २०२५-२६ या गळीत हंगामासाठी बसविण्यात येणाऱ्या मिलरोलरचे पूजन कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे हस्ते झाले.

सन २०२५-२६ च्या गळीत हंगामात जास्तीत जास्त ऊस गाळपाचे उद्दिष्ट असून त्याचे पूर्व तयारीचे दृष्टीने कारखाना मशीनरीचे ओव्हर ऑइलिंगची कामे जोमाने सुरू आहेत. तसेच ऊस तोडणी-वहातुक मजूर भरतीचे काम ही प्रगती पथावर आहे. त्याचाच एक भाग असलेल्यामिलरोलरचे देखभाल दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्याने तो बसविण्याचे काम सुरू करण्याप्रसंगी रोलरचे पूजन कारखान्याचे अध्यक्ष माजी



आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे संचालक माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, संचालक ॲड. देसाई देशमुख, काकासाहेब नरवडे, काकासाहेब शिंदे, काशिनाथ नवले, प्रा. नारायण म्हस्के, बबनराव भुसारी, भाऊसाहेब कांगुणे, जनार्धन कदम, शिवाजीराव कोलते, मच्छिंद्र म्हस्के, पंडितराव भोसले, सखाराम लव्हाळे, शंकरराव पावसे, विकास नन्नवरे, अशोकराव मिसाळ, दादासाहेब गंडाळ, शिवाजीराव कोलते, भाऊसाहेब कांगुणे, डॉ.नारायण म्हस्के, विष्णूपंत जगदाळे,


कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, सचिव रवींद्र मोटे, कामगार संचालक सुखदेव फुलारी, तांत्रिक सल्लागार एस.डी. चौधरी, एम. एस. मुरकुटे, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, विलासराव लोखंडे, इब्राहिम सय्यद, नंदकुमार चोथे, मोहन दुधाळ, शशिकांत निपुंगे, रोहित मोटे, गोडावून किपर विवेक जगदाळे, कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, राजेंद्र काकडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## पाथर्डी बाजार समितीत कांद्याला २००० रुपये उच्चांकी भाव : सुभाष बर्डे

**पाथर्डी । प्रतिनिधी-**

पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आज बुधवार दि. २८ मे रोजी झालेल्या लिलावात एक नंबर कांद्याला २००० रुपये भाव मिळाला असुन गेल्या तीन महिन्यातील हा जिल्ह्यातील हा सर्वाधिक उच्चांकी भाव मिळाला आहे तरी तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपला माल पाथर्डी बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आणावा, असे आवाहन सभापती सुभाष बर्डे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती देतांना सभापती बर्डे म्हणाले की, पाथर्डी बाजार समितीमध्ये पाथर्डी येथील मुख्य आवारात आठवड्यातील प्रत्येक बुधवार व रविवार दोन दिवस कांदा लिलाव केले जातात तर तिसगाव उपबाजारात आठवड्यातील दर मंगळवार, शुक्रवार व रविवारी लिलाव सुरू असतात. बाजार समितीमध्ये लिलावासाठी चांगले कांदा व्यापारी येत असुन बाजार समितीच्या वतीने त्यांना चांगल्या सुविधा देण्यात येत आहेत. गेल्या तीन महिन्यापासुन कांद्याचे दर १ हजार ते १३०० रुपयांच्या आसपास होते. कांदा दर सतत



कोसळत आसतांना मंगळवार दि. २७ रोजी तिसगाव उपबाजारात एक नंबर कांद्याला १६०० रुपये भाव मिळाला होता. तो जिल्ह्यात सर्वाधिक होता मात्र आज पाथर्डी बाजार समितीमध्ये झालेल्या लिलावात २४६६ गोणी व १२३३ क्विंटल कांद्याची आवक झाली असुन एक नंबर कांद्याला २००० रुपये तर दोन नंबर ११०० ते १५०० रुपये दर मिळाला आहे. हा जिल्हयात उच्चांकी भाव मिळाला आहे. यामुळे शेतकऱ्यात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असुन शेतक ऱ्यांनी आपला कांदा पाथर्डी व तिसगाव बाजार मध्ये विक्रीसाठी आणावा असे अवाहन सभापती बर्डे व संचालक मंडळाने केले आहे.

# प्रदीर्घ सेवेनंतर अंगणवाडी सेविका इंदुबाई शहादेव आव्हाड सेवानिवृत्त

**शेवगाव । वीरभूमी-**

शेवगाव तालुक्यातील चव्हाणवाडी येथील अंगणवाडी सेविका सौ. इंदुबाई शहादेव आव्हाड या ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर अंगणवाडी सेविका या पदावरून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या. त्यांचा गावकऱ्यांनी सहकुटुंब सत्कार करून निरोप दिला. मात्र हा निरोप देताना गावकऱ्यांनाही गहिवरून आले. यावेळी आयोजित कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी वडुले खुर्द गावचे माजी सरपंच मारुती राजाराम पांढरे हे होते.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य व मॅडमचे माजी विद्यार्थी रामदास पांढरे सर बोलताना म्हणाले की, माझ्या यशामध्ये बाईंचा सिंहाचा वाटा आहे. बाईंनी माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम केल्यामुळेच या छोट्याशा वाडीतील अनेक विद्यार्थी उच्च पदापर्यंत पोहोचले. बाईंना पुढील आयुष्य निरोगी, भरभराटीचे, आनंदाचे, सुख-समृद्धीचे, समाधानाचे जावो अशी ईश्वरचरणी प्रार्थना त्यांनी केली. यावेळी मंखळराव पांढरे यांनीही आपल्या मनोगतातून बाईंच्या



आठवणींना उजाळा दिला.

यावेळी अमोल आव्हाड, प्रदीप आव्हाड, ब्रम्हानंद आव्हाड, करीम शेख यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमास बाईंचे सर्व कुटुंबीय, नातेवाईक व चव्हाणवाडी येथील कुंडलिक पांढरे, महादेव पांढरे, संदीप पांढरे, गोरक्ष पांढरे, नवनाथ पांढरे, तुकाराम पांढरे, संदीप रुपनर, प्रल्हाद शिंगाडे, पांडुरंग पांढरे, ज्ञानेश्वर पांढरे, सदाशिव पांढरे, शेऊबाई रुपनर, शालिनी पांढरे, कडूबाई पांढरे,वैशाली पांढरे, अनिता पांढरे, आशाबाई पांढरे, स्वाती पांढरे, रोहिणी पांढरे, कल्पना पांढरे, कांताबाई दिंडे, भिमाबाई पांढरे, प्रयागाबाई दिंडे, छगाबाई पांढरे, कमलबाई पांढरे, शोभा पांढरे, शितल पांढरे, आसराबाई पांढरे, ज्योती पांढरे, येल्हूबाई पांढरे, वच्छलाबाई पांढरे, रंजना काळपुंड इत्यादी. सह ग्रामस्थ, माता भगिनी, युवक मित्र व बाईंचे लाडके विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सौ. इंदुबाई शहादेव आव्हाड यांनी आपल्या मनोगतुन ३६ वर्षांचे आलेले अनुभव व गावकऱ्यांनी केलेले सहकार्य याबद्दल गावकऱ्यांप्रति कृतज्ञता भाव व्यक्त केला. तसेच बाईंचे ज्येष्ठ सुपुत्र प्रदीप आव्हाड यांनी गावकऱ्यांनी केलेल्या सहकार्यामुळेच आमच्या जीवनाचे सोने झाले असे गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास पांढरे यांनी केले तर अमोल आव्हाड आभार यांनी मानले.

# नगर शहराचा स्थापना दिवस साजरा

### कविता, शायरी व मुशायराची रंगली जुगलबंदी । शहर स्थापनेपासूनच्या ऐतिहासिक घटनांना उजाळा

**नगर । वीरभूमी-**

अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) शहराचा ५३५ वा स्थापना दिवस बुधवारी (दि. २८ मे) उत्साहात साजरा करण्यात आला. नगरकरांच्या वतीने शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर चादर अर्पण करण्यात आले. हाजी अजीजभाई चष्मावाला सामाजिक प्रतिष्ठान, मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी कविता, देशभक्तीवरील गीत, शायरी व मुशायराने बागरोजा येथे मैफल रंगली होती. राष्ट्रीय किर्तीच्या शायरा कमर सुरुर यांनी शायरी व मुशायरा सादर केला. एक लम्हा समझकर यू भूल जाना ना मुझे... सदिया जुडी हुई हे मेरे दास्तान से! ही शायरी अहमद बादशाह यांच्यावर सादर करण्यात आली. शायरी, कविता व मुशायराच्या जुगलबंदीचा आनंद उपस्थित नगरकारांनी लुटला.

या अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी हाजी अजीजभाई चष्मावाला प्रतिष्ठानचे हाजी मन्सूरभाई शेख, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, रहमत सुलतान



फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाचे अभिजीत वाघ, इतिहासाचे अभ्यासक भूषण देशमुख, उबेद शेख, भैरवनाथ वाकळे, पत्रकारांच्या नाशिक विभागीय अधिस्विकृती समितीचे सदस्य विजयसिंह होलम, डॉ. कमर सुरुर, संध्या मेढे, अन्सार सय्यद, आसिफ शेख, आर्किटेक फिरोज शेख, जुनेद शेख, नवेद शेख, अल्तमश जरीवाला, आसिफ खान, शफाकत सय्यद, सलीम सहारा, नईम सरदार, फिरोज शेख, अल्ताफ शेख, महबूब सय्यद, वाहिद शेख, अबुजर सय्यद, रमिझ शेख, मोसीन शेख, फैय्याज शेख, हमजा शेख आदींसह इतिहास प्रेमी, पत्रकार, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भूषण देशमुख यांनी शहर स्थापनेपासून ते आज पर्यंतच्या ऐतिहासिक घटनांना उजाळा दिला. शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा हे नगरकरांचे वैभव असून, अहमद निजामशहाच्या दूरदृष्टीमुळे आपल्याला हे वैभवशाली शहर लाभल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जगात फार कमी शहरे अशी आहे, ज्यांचा स्थापना दिवस माहिती आहे, त्यापैकी एक अहमदनगर शहर असून, संस्थापक अहमद निजाम शहा यांनी २८ मे १४९० रोजी वसविले. या कार्यक्रमातून शहराच्या वैभवशाली इतिहासाला उजाळा देण्यात आला. सूत्रसंचालन उबेद शेख यांनी केले तर भैरवनाथ वाकळे यांनी आभार मानले.

## रमाबाई भिमराव आंबेडकर यांना भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने अभिवादन



**नगर । वीरभूमी-**

भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे रमाबाई भिमराव आंबेडकर यांच्या ९० व्या स्मृतिदिनानिमित्त सिद्धार्थ नगर येथील सिद्धार्थ बुद्ध विहार येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष बौद्धचार्य दीपक बाजीराव पाटोळे समवेत शाहुल कांबळे, दादू कांबळे, आशाबाई कांबळे, सागर गायकवाड, प्रणय सोनवणे, विजय डंबाळे, विनायक चव्हाण, किरण गायकवाड, विशाल कांबळे, गुलाब गाडे, बाळासाहेब गायकवाड, हेमाताई गायकवाड, मायावती गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, निर्मला गायकवाड, लक्ष्मीबाई गायकवाड, मनोज रणमले आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शहराध्यक्ष बौद्धचार्य दीपक पाटोळे महाले की, रमाबाई हे खंबीर स्त्री त्याग मूर्ती होत्या कोणत्याही परिस्थिती पुढे झुकल्या नाही व बाबासाहेबांना दिलेली साथ कुणीही विसरू शकत नाही जर बाबासाहेबांचा इतिहास लिहायचा असेल तर रमाबाई चे पान लिहावंच लागेल बाबासाहेबांना रमाबाईंनी दिलेली साथ व केलेले कष्ट व संघर्ष विषयी माहिती देऊन रमाबाईंच्या आठवणींना उजाळा दिला तर हेमाताई गायकवाड यांनी रमाबाई यांचा जीवन प्रवास व संघर्ष बद्दल माहिती दिली.

# नैसर्गिक आपत्तीत शासन खंबीरपणे तुमच्या पाठीशी

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । सोनवाडे, खडकी आणि वाळकी येथील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची केली पहाणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

यापुर्वी कधीही झाली नव्हती अशी नैसर्गिक आपत्ती पावसाने निर्माण केली आहे. झालेल्या नुकसानीचे सरकट पंचनामे अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करून तातडीने करावेत. शासनाच्या स्थायी आदेशाप्रमाणे आपत्तीग्रस्तांना मदत मिळेलच, परंतू विशेष बाब म्हणूनही मदत व पुनर्वसन विभागाकडे मदतीचे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. या संकटाप्रसंगी सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही भेटी दरम्यान दिली.

मागील दोन दिवसात जिल्हयात पावसाने झालेल्या नुकसानीची पाहाणी पालकमंत्री विखे पाटील यांनी नगर तालुक्यातील सोनवाडे, खडकी आणि वाळकी या गावांना भेटी देवून केली. ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेत त्यांना दिलासा दिला. या नैसर्गिक संकटात सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. यावेळी आ.शिवाजीराव कर्डीले, आ. काशिनाथ दाते, माजी आमदार बबनराव पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, पशुसंवर्धन विभागाचे डॉ. सुनिल तुंभारे यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील यांनी नुकसान झालेल्या भागाची पाहाणी करताना प्रामुख्याने फुटलेले बंधारे, नाले आणि कालव्याच्या परीस्थितीची माहीती घेतली. मोठ्या स्वरुपातील पावसाने पाण्याचा प्रवाह सर्वत्र वाढल्याने बंधारे फुटले आहेत. शेतामध्ये मोठ्या स्वरूपात पाणी गेल्याने शेतजमीन खरडून गेली. जमीन पूर्णपणे नापीक झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

यापुर्वी असा पाऊस कधीही झाला नव्हता. काही तासात ११८ मी.मी. पावसाची झालेली नोंद ही मोठे संकट उभे करणारी ठरली आहे. यामुळे शेत जमीनी बरोबरच शेतात असलेल्या काही पीकांबरोबर उत्पादित मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सर्व नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या असून, पंचनामे तातडीने व्हावेत म्हणून अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी जिल्हाधिकारी तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

काही भागातील जनावरे वाहून गेली आहेत. त्याबाबत पशुसंवर्धन विभागाने माहीती घेवून मदतीचे प्रस्ताव तयार करावेत. सद्यपरिस्थितीत चारा शिल्लक नाही ही समस्या मोठी निर्माण झाली असल्याने दुष्काळी परीस्थीतीत चारा उत्पादन करण्यासाठी विभागाने अनुदान दिले होते. मात्र आता चारा उपलब्ध करून तो ठरलेल्या दराप्रमाणे खरेदी करावा लागणार असल्याचे विखे पाटील म्हणाले.

नदीकाठच्या अतिक्रमणाचा विषय अतिशय गंभीर झाला आहे. याबाबत आता ठोस कारवाई करून उपाय योजना कराव्या लागतील. कालवे आणि तत्सम व्यवस्थेच्या आवती भोवती असलेली अतिक्रमण जलसंपदा विभागाने काढण्याच्या सूचना यापुर्वीच दिल्या आहेत. शहरातील अतिक्रमणा संदर्भात महापालिकेने कडक धोरण स्विकरण्याची गरज असल्याचे मत विखे पाटील यांनी व्यक्त केले.

अद्यापही पावसाचे प्रमाण कमी होण्यास तयार नाही.मात्र नैसर्गिक परीस्थितीचे संकट पाहाता सर्व विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून जिल्हाधिकारी आणि विविध विभागांच्या



अधिकाऱ्यांनी कालच्या प्रसंगात वेळीच उपाय योजना केल्याबद्दल समाधान व्यक्त करून शहरात स्लॅब कोसळून मुलीच्या झालेल्या मृत्यूची घटना दुर्दैवी असल्याचे विखे पाटील म्हणाले.

तालुक्यातील वाळकी गावातील रस्ता पावसाने वाहून गेला. यामुळे गावातील दळणवळण ठप्प झाले आहे. मोठ्या स्वरुपातील असा पाऊस यापुर्वी कधीही पाहीला नसल्याची भावना स्थानिक ज्येष्ठ नागरीक, महीलांनी मंत्री विखे पाटील यांच्याशी बोलताना व्यक्त केली. वाळकीतही शेतजमीन जनावारांचे गोठे वाहून गेले आहेत.

ग्रामस्थांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील यांनी सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही देवून ज्यांच्या पीकांची सातबारा उताऱ्यावर नोंद नाही आशा शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सद्यस्थिती विचारात घेवून पंचनामे करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यासाठी मदत व पुनर्वसन विभागाकडे विशेष बाब म्हणून मदतीसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. पाणी कमी झाल्यानंतर भराव टाकून बंधारे ओढे नाले यांचे प्रवाह सुरळीत करण्याच्या सूचना त्यांनी जलसंपदा विभागाला दिल्या.

# सुरळीत वाहतुकीसाठी राष्ट्रवादी आक्रमक

## राष्ट्रवादीचा पोलीस प्रशासनाला चक्काजाम आंदोलनाचा इशारा

**● नगर । प्रतिनिधी–**

शहरातील केडगांव, कायनेटीक चौक, सक्कर बिस्किट कारखाना, छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्टेटबँक चौक, कोटला स्टँड, महानगरपालिका मुख्य कार्यालय, तसेच शहर परिसरातील वाहतुक संपुर्ण पणे विस्कळीत झाली असुन नागरीकांना तासंतास वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रुग्णांना घेऊन जाण्याऱ्या अब्युलेंन्स याला सुधा या वाहतुकिच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अनेक रुग्णांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊन जिवीत हानी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. या वाहतुक कोंडीबाबत नगरकरांमध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली असुन या वाहतुक समस्येमुळे नागरीक प्रचंड त्रस्त झालेले आहे.



या वाहतुक समस्येवर तोडगा निघुन वाहतुक सुरळीत न झाल्यास येत्या गुरुवारी दि.२९ रोजी सकाळी ११:०० वा. कोतवाली पोलिस स्टेशन व तोफखाना पोलिस स्टेशनच्या आवारात तसेच उड्डान पुलाजवळ शिल्पा गार्डनच्या समोर तसेच कोटला स्टँड जवळील उड्डान पुला शेजारी एकाच वेळी या सर्व ठिकाणी ठिय्या आंदोलन करून चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संपत भारस्कर, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, राजेश भालेराव, योगेश गलांडे, दीपक खेडकर, राहुल कातोरे, गिरीश जगताप आदी उपस्थित होते.

शहरामध्ये वाहतूक समस्येचा प्रश्न गंभीर बनला असून त्याचा त्रास शहरातील नागरिकांना होत आहे. महिला भगिनी आपल्या दुचाकी गाडीवरून प्रवास करीत असताना त्यांची अतोनात हालवत आहे. तसेच शाळकरी मुले सायकलवरून प्रवास करीत असताना मोठ्या समस्येला सामोरे जात आहे. महामार्गावर ठिकठिकाणी अतिक्रमण असून यामुळे देखील वाहतूक कोंडी होत आहे. तसेच वाहतूक कुंडीमुळे दुर्दैवाने एखाद्या दिवशी मनुष्य हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वाहतूक कुंडीचा प्रश्न पोलीस प्रशासनाने नियोजन करून मार्गी लावावा अशी मागणी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी व्यक्त केली.


# देवाभाऊ कुस्ती स्पर्धा आता ४ व ५ जून रोजी होणार

## अरुण मुंढे यांची माहिती । पावसामुळे कुस्ती स्पर्धा पुढे ढकलली

**● शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव येथे देवाभाऊ कुस्ती स्पर्धेचे २८ व २९ मे रोजी आयोजन केले होते. परंतु पावसाच्या संततधारेमुळे या स्पर्धा तात्पुरत्या स्थगित करून ४ जून व ५ जून रोजी आयोजित केल्या आहेत. तरी याची सर्व कुस्ती स्पर्धकांनी व कुस्तीप्रेमींनी नोंद घ्यावी, अशी माहिती भाजपाचे प्रदेश सचिव तथा वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष अरुण मुंढे यांनी दिली.

कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाबाबत ते म्हणाले, ठरलेल्या नियोजनाप्रमाणे स्पर्धेचे बक्षीस वितरण गुरुवार, दि. ५ जून २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते होणार आहे. तसेच महाराष्ट्र, विधान परिषद सभापती राम शिंदे व जलसंपदा मंत्री, महा. राज्य तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार समारंभ होणार आहे. स्पर्धे चे खास आकर्षण म्हणजे मल्लांची



निमंत्रित थरारक कुस्त्या होणार आहेत. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध दिल्लीचा रुस्तम–ए–हिंद अजय बनवाल यांच्यात दोन लाख रुपयांच्या बक्षिसावर रंगणारी कुस्ती प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्या दीड लाख रुपयांची कुस्ती होणार असून महिला विभागातही जबरदस्त झुंज पाहायला मिळणार आहे.

राष्ट्रीय पदक विजेती उषा कुमारी विरुद्ध राष्ट्रीय पदक विजेती सोनाली मंडलीक यांच्यात एक लाख रुपयांवर निमंत्रित कुस्ती होणार आहे. ९ वजनीगटातील कुस्त्यांमध्ये विजेत्यांना रोख रकमेची बक्षीस देण्यात येणार आहेत. ५ हजार ते ५१ हजार रुपयापर्यंतचे रोख बक्षीस देण्यात येणार आहे. उपविजेते व तृतीय क्रमांकाच्या मल्लानांही आकर्षक बक्षीस राहणार असून स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास चांदीची गदा प्रदान करण्यात येणार आहे. तसेच सर्व विजेत्या मल्लांना विशेष चषकांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक अरुण मुंढे यांनी दिली.

शेवगाव येथे होणारी यंदाची देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा संपूर्ण जिल्ह्यातील आणि राज्यातील कुस्ती प्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहे. या भव्य आयोजनामुळे कुस्तीचा उत्सव रंगणार असून कुस्ती स्पर्धकांनी या स्पर्धेत जास्तीत जास्त सहभाग घ्यावा व कुस्तीप्रेमींनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर साखर कारखाना

# संचालकपदी विकास नन्नवरे यांची बिनविरोध निवड

**● नेवासा । वीरभूमी –**

तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालकपदी आपेगाव (ता. शेवगाव) येथील विकास चंद्रभान नन्नवरे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मतदार संघ क्र. ३ मधील अनुसूचित जाती–जमाती या प्रवर्गातील संचालक दीपक तुळशीराम नन्नवरे यांचे निधन झाल्याने नैमित्तिक रिक्त झालेले संचालक पद भरण्यासाठी अध्यासी अधिकारी प्रादेशिक उपसंचालक (साखर) संजय गोंदे यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता कारखाना अतिथीगृहामधील सभागृहात संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आले होते.

नैमित्तिक रिक्त झालेले संचालक पदासाठी विकास चंद्रभान नन्नवरे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने



त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा अध्यासी अधिकारी श्री. गोंदे यांनी केली.

कारखान्याचे अध्यक्ष माजी आ.नरेंद्र घुले पाटील, संचालक माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, संचालक ॲड. देसाई देशमुख, आ. विठ्ठलराव लंघे, काकासाहेब नरवडे, काकासाहेब शिंदे, प्रा. नारायण म्हस्के, बबनराव भुसारी, भाऊसाहेब कांगुणे, जनार्धन कदम, शिवाजी कोलते, मच्छिंद्र म्हस्के, पंडितराव भोसले, सखाराम लव्हाळे, शंकरराव पावसे, गोरक्षनाथ गंडाळ, सौ. लताताई अशोकराव मिसाळ, सौ.रत्नमाला काशिनाथ नवले, सौ.ताराबाई हनुमान जगदाळे यांचेसह प्रादेशिक सह संचालक (साखर) कार्यालयाचे अधीक्षक उमेश कुलकर्णी, अशोकराव मिसाळ, दादासाहेब गंडाळ, विष्णू जगदाळे, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, सचिव रविंद्र मोटे, कामगार संचालक सुखदेव फुलारी, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के, लीगल ऑफिसर सुनील शिंदे, विलासराव लोखंडे, डॉ. सुधाकर लांडे, राजेंद्र देशमुख, तुषार नन्नवरे आदी यावेळी उपस्थित होते.

# शहरातील वाहतूक प्रश्नाबाबत पोलीस प्रशासन व राष्ट्रवादीची बैठक

**● नगर । वीरभूमी–**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शना खाली शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पोलीस प्रशासनाला चक्काजाम आंदोलनाचा इशारा दिला होता. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पोलीस प्रशासनाची संयुक्त बैठक संपन्न झाली. असून १५ दिवसात वाहतूक कोंडीची समस्या सोडविली जाईल असे आश्वासन पोलीस प्रशासनाच्या वतीने शिष्टमंडळास दिले. यावेळी कोतोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे म्हणाले की, शहरातील नागरिकांनी वाहतूक कोडीची समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करावे तसेच कानेटिक चौक, केडगाव वेस, माळीवाडा बस स्टॅन्ड, मार्केट यार्ड, सक्कर चौक, कोठला स्टॅन्ड, प्रोफेसर कॉलनी चौक, दिल्ली गेट, प्रेमदान चौक, भिंस्तबाग चौक परिसरामध्ये नियमित वाहतूक पोलीस ठेवले जातील. तसेच अवैद्य वाहतूक प्रवासी करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. तसेच एसटी स्टँड परिसरातील ट्रॅव्हल थांबा बंद केला जाईल. शहरातील पॅगो रिक्षाला देखील शिस्त लावली जाईल या कामासाठी महापालिकेने देखील सहकार्य करण्याची गरज आहे. रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत पालिकेने कठोर कारवाई केली पाहिजे, पोलीस प्रशासन नागरिकांच्या सहकार्यातून नक्कीच वाहतुकीची शिस्त लावेल असे ते म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बोरसे, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, नितीन घोडके, वैभव ढाकणे, जॉय लोखंडे, दीपक खेडकर आदी उपस्थित होते.